# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६१ वा ❑ शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# जळगावी रंगणार तिसरे अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

**जळगाव –** जळगाव शहरातील उत्तर महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रातील अग्रेसर सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाच्या तेविसाव्या वर्धापन दिनानिमित्त लोकवर्गणीतून दोन दिवसीय तिसरे अखिल भारतीय सूर्यो दय मराठी साहित्य संमेलन शनिवार दि २० व रविवार दि २१ डिसेंबर रोजी एम जे कॉलेज जळगाव येथील जुने कॉन्फरन्स सभागृहात रा.रं.बोराडे व्यासपीठावर आयोजित करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन यांनी दिली आहे.

संमेलन कालावधीसाठी परिसरास बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी, सभागृहास साने गुरुजी सभागृह, व्यासपीठास रा. रं बोराडे व्यासपीठ, प्रवेशद्वारास त्र्यंबक बापूजी ठोंबरे (बालकवी) अशी नावे देण्यात आली आहे.

सुप्रसिद्ध कवयित्री श्रीमती अंजली कुळकर्णी (पुणे) यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता होईल. संमेलनाचे स्वागताध्यक्ष- गजलकार अनिल सर्जेराव पाटील (जळगाव ) हे असून मानवतावादी विचारवंत सुप्रसिद्ध लेखक प्रा डॉ श्री म सु पगारे (जळगाव) हे या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणार असून सुप्रसिद्ध लेखक प्रा डॉ श्री प्रमोद पडवळ (वाराणसी) हे समारोपीय सत्राचे अध्यक्षपदी असतील.

संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून गजलनवाज भीमराव पांचाळे (मुंबई ) दुसरे अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष

सुप्रसिद्ध कवयित्री सौ माया दिलीप धुप्पड (जळगाव)अठरावे सूर्योदय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष, सुप्रसिद्ध लेखक प्रा डॉ संजीव गिरासे बाविसावे सूर्योदय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष, प्राचार्य डॉ कमलाकर पायस (अमरावती), ज्येष्ठ पत्रकार अशोक कुळकर्णी (जळगाव), कविश्री राजेंद्र रायसिंग (जळगाव)

माजी पोलीस उप अधीक्षक, ज्येष्ठ लेखिका प्रा सुमनताई मुठे (नाशिक), ज्येष्ठ पत्रकार सावळीराम तिदमे (नाशिक) हे उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाचे सूत्रसंचालन श्रीमती ज्योती राणे (जळगाव) ह्या करतील. शनिवार दि २० डिसेंबर २०२५ रोजी संमेलनाच्या पहिल्या सत्रात उद्घाटन सोहळ्यात कवि प्रा श्री अरविंदा भामरे (शिरपूर ) यांच्या शापित कोलाहलाच्या नोंदी – या काव्यसंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन होईल.

दुसऱ्या सत्रात थोरांच्या स्मृती जागवणारा जागवू या स्मृती हे सत्र प्रा डॉ वासुदेव वले (पाचोरा) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात श्रीमती जयश्री काळवीट – भुसावळ (साने गुरुजी), ॲड मुकुंदराव जाधव- जळगाव (न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर), माणिक पुरी – परभणी (मारूती चित्तमपल्ली) हे स्मृती जागवणार आहेत.

तिसऱ्या सत्रात वर्तमान काळातील कवितेचे काव्य मूल्य हरविले आहे का ? या विषयावर डॉ पापालाल पवार (धुळे) यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यात मनोहर आंधळे- चाळीसगाव, अनिल शिंदे- जळगाव, प्रा संध्या महाजन–जळगाव हे सहभागी होतील.

चौथे सत्रात ‘‘ती‘‘ चे कविसंमेलन सुप्रसिद्ध कवयित्री श्रीमती छाया बेले (नांदेड ) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या सत्राचे

सूत्रसंचालन- श्रीमती पुष्पा साळवे (जळगाव)

ह्या करणार असून यात प्रा संध्या महाजन- जळगाव, शैलजा करोडे- मुंबई, शहानूर हैदर तडवी जळगाव, प्रा विमल वाणी म्हसावद, जयश्री काळवीट–भुसावळ, मंगला रोकडे – एरंडोल, इंदिरा जाधव – जळगाव, तन्वी श्रीराम वाघ – शेगाव,ज्योती राणे- जळगाव, गंगा सपकाळे- गाढोडा, सोनाली बेले – नांदेड, रूपाली माळी – पहूर, सुनीता येवले – जळगाव, शीतल पाटील – जळगाव, किर्ती पाटील – झोपे – जळगाव, मनीषा प्रवीण रघुवंशी – एरंडोल, चित्रा पगारे – जळगाव, प्रज्ञा नांदेडकर- जळगाव, अलका साळुंखे–जळगाव हे सहभागी होतील.

पाचवे सत्रात आजची तरुणाई आणि मराठी साहित्य जगत या विषयावर प्राचार्य डॉ रमेश जलतारे (पांढरकवडा जि यवतमाळ ) यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यात

जिजाबराव वाघ–चाळीसगाव, गोकुळ बागुल- अमळनेर, प्रा अरविंदा भामरे- शिरपूर हे सहभागी होतील. सहावे सत्रात कथाकथन प्रा विजया मारोतकर (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात अरविंद नारखेडे- जळगाव, सचिन देवरे – पाचोरा, श्रीमती मीना सैंदाणे–जळगाव हे सहभागी होतील.

सातवे सत्रात खानदेशातील समृद्ध संत परंपरा व साहित्य या विषयावर प्रा डॉ धनराज धनगर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात बापू हटकर (धुळे), प्रा डॉ नेत्रा उपाध्ये (जळगाव ), खेमराज धनराज पाटील (आर्वी जि धुळे) हे सहभागी होतील.

आठवे सत्रात गजलनवाज भीमराव पांचाळे यांचा माझा गजल प्रवास या वर मुलाखत. गजलकार डॉ श्री ज्ञानेश पाटील- जळगाव हे घेतील.

रविवार दि २१ डिसेंबर २०२५ रोजी नववे सत्रात शब्द झंकार सत्रा अंतर्गत कविसंमेलन डॉ अ फ भालेराव (मुक्ताईनगर) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या सत्राचे सूत्रसंचालन- प्रा अरविंदा भामरे (शिरपूर) हे करतील तर यात रवीराज सोनार- मालेगाव, डॉ रमेश जैन- धुळे, कैलास करंके- शिरपूर, प्रकाश पाटील -जळगाव, डॉ अशोक पारधे – जळगाव, डॉ प्रदीप सुरवाडकर- जळगाव, प्रेमचंद अहिरराव – धुळे, प्रा रत्नाकर कोळी – जळगाव, राहूल तायडे – वरणगाव, श्रीराम वाघ- शेगाव, कुशल दुसाने – आसोदा, शांतीलाल ननवरे – बारामती, विनायक काळे – कनारखेड (बुलढाणा), शंकर भामेरे -पहूर, निंबा बडगुजर – एरंडोल, विशाल नवले – नांदूरा, प्रदीप डहाळे – गुढे भडगाव,किशोर नेवे – जळगाव यांच्या सह निवडक कवी सहभागी होतील.

दहावे सत्रात लोकशाहीच्या सबलीकरणात सारस्वतांची भूमिका या विषयावर प्रा डॉ प्रभाकर जोशी(अमळनेर ) यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यात प्रा बी एन चौधरी- धरणगाव, प्रा डॉ दिलीप लोखंडे- साक्री, प्रा डॉ सतीश मस्के- पिंपळनेर हे सहभागी होतील.

गजलधारा अकराव्या सत्रात माजी जिल्हाधिकारी सुप्रसिद्ध ग़ज़लकार दिलीप पांढरपट्टे (मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या सत्राचे सूत्रसंचालन- प्रा डॉ रविप्रकाश चापके ( पुसद जि यवतमाळ) हे करणार असून यात डॉ ज्ञानेश पाटील जळगाव, शोभा बडवे मालेगाव, अजय बिरारी नाशिक, ॲड विलास मोरे एरंडोल, ॲड मुकुंदराव जाधव जळगाव, नरेंद्र पाटील धुळे, सुधीर महाजन जळगाव, नंदकिशोर ठोंबरे नाशिक, योगिता पाटील चोपडा , शरद धनगर अमळनेर, गो शि म्हसकर नगरदेवळा,ज्योती उत्तमराव वाघ जळगाव हे सहभागी होतील.

बारावे सत्रात सोशल मिडिया वाचनसंस्कृती नष्ट करीत आहे या विषयावर परिसंवाद प्रा व पु होले (सावदा जि जळगाव ) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात डॉ जगदीश पाटील (भुसावळ), प्रशांत गौतम (छत्रपतीसंभाजी नगर), प्रशांत गुरव (मंगरूळ ,चोपडा) हे सहभागी होतील.

तेरावे सत्रात कविसंमेलन प्रा डॉ श्री यशवंतराव पाटील (नाशिक) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या सत्राचे सूत्रसंचालन- अनिल शिंदे (जळगाव) हे करतील यात प्रभाकर शेळके धुळे, प्रभाकर महाजन जळगाव, जितेंद्र कुंवर जळगाव,

शशिकांत वडोदकर जळगाव, प्रा वा ना आंधळे एरंडोल,सौ माया दिलीप धुप्पड जळगाव, ज्ञानेश मोरे जळगाव, शशिकांत हिंगोणेकर जळगाव, डॉ मिलींद बागुल जळगाव, पौर्णिमा हुंडीवाले जळगाव, चंद्रकांत चव्हाण जळगाव, प्रा सुधीर त्रिभुवन नवापूर, प्रशांत पनवेलकर वर्धा, प्रा रमेश माने अमळनेर, दिनेश चव्हाण चाळीसगाव,अशोक भालेराव नाशिक हे सहभागी होतील.

चौदावे सत्रात संमेलनाध्यक्षांची मुलाखत

प्रा डॉ सत्यजित साळवे जळगाव, ॲड विलास मोरे एरंडोल हे घेतील.

पंधरावे सत्रात संमेलनाचा समारोप सुप्रसिद्ध लेखक प्रा डॉ प्रमोद पडवळ ( वाराणसी) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात वाड्मय व साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

गौरवार्थी : आई बिजलाई व आप्पासाहेब सुपडू पुना पगारे सूर्योदय गजल रंग पुरस्कार गजलनवाज भीमराव पांचाळे (मुंबई)

**(पान ४ वर)**

## विशेष लेख...

# नायलॉन मांजा ऐवजी पर्यावरण पूरक मांजा वापरा

**– प्रा डॉ सुधीर अग्रवाल**

**ज्योतिर्मय साहित्य**

मित्रांनो तीळ संक्रांत जवळ येत आहे.मकरसंक्रांतीला अवघे काही दिवस शिल्लक आहे. मकरसंक्रात म्हटलं की पतंग उडवणे आलेच. गेल्या कित्येक वर्षांपासून मकरसंक्रातीपासून पतंग उडवण्याची मोठी परंपरा आहेत. पण पतंगासोबत वापरला जाणारा नायलॉनचा मांजा हा दिवसेंदिवस घातक ठरताना दिसत आहे. नायलॉन मांजावर बंदी असताना देखील शहरात मांजाचा सर्रास वापर सुरू आहेपतंगबाजी करताना काटाकाटीच्या स्पर्धेत चिनी आणि नायलॉन मांजाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे पतंगप्रेमींबरोबरच रस्त्यावर चालतानाही जीव मुठीत घेऊन फिरावे लागते. या धोकादायक मांजामुळे या कालावधीत अनेक पक्षी, प्राणी जखमी होतात, तर काही मृत्यूमुखी पडतात. त्यामुळे या मांजावर बंदी घालण्याची सूचना न्यायालयाने सरकारला केली. त्यानुसार राज्य सरकारने १९८६च्या पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कलम ५ नुसार या मांजाची विक्री व वापरावर बंदी घातली. तरीही या मांजाची विक्री आणि वापर सर्रास सुरू आहे. अशा विक्रेत्यांवर आणि मांजा वापरणाऱ्या पतंगप्रेमींवर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दुकानांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत; तसेच आपल्या आजूबाजूला नायलॉन मांजाची विक्री किंवा वापर करताना कुणी आढळल्यास कळवण्याचे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

नायलॉन मांजा (चायनीज मांझा) वापरू नका कारण तो प्लास्टिकचा बनलेला असतो, त्यावर काचेची पावडर लावलेली असते, ज्यामुळे तो अत्यंत धारदार होतो आणि त्यामुळे अनेक दुचाकीस्वार, पक्षी आणि सामान्य नागरिकांचा मृत्यू होतो, तसेच तो पर्यावरणासाठी हानिकारक आहे, म्हणून अनेक राज्यांमध्ये त्यावर बंदी आहे. त्याऐवजी, पारंपरिक सुती पर्यावरण पूरक मांजा वापरा आणि सुरक्षिततेचे नियम पाळा.

मांजामुळे पक्षी आणि मानवांचे गळे कापले जातात, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी होते.

पर्यावरणाची हानी: हा मांजा प्लास्टिकचा असल्याने तो विघटित होत नाही आणि पर्यावरणात मिसळून प्रदूषण करतो. हजारो पक्षी या मांजामध्ये अडकून किंवा त्याचे पंख कापले जाऊन मरतात.विशेष म्हणजे नायलॉन मांजा

दुचाकीस्वारांसाठी फार मोठा धोका आहे.वाहनांच्या टायरमध्ये अडकून अपघात होतात, तसेच गळ्यात अडकून अपघात होतात.

अनेक ठिकाणी, जसे की महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, आणि इतर शहरांमध्ये, नायलॉन मांजा (चीनी मांजा) च्या उत्पादन, विक्री आणि वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाते. नायलॉन मांजा विक्री आणि वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. यापुढंही नायलॉन मांजाद्वारे पतंग उडवणाऱ्यांवर आणि त्यांच्या पालकांवरही कारवाई केली जाते.

पतंग उडविण्याच्या हौसेसाठी पारंपरिक मांजा वापर करा. नैसर्गिक धाग्यांपासून बनवलेला मांजा वापर करा

सुरक्षिततेची काळजी घ्या.

दुचाकी चालवताना गळ्याभोवती स्कार्फ किंवा रुमाल बांधा आणि हेल्मेट वापरा. नायलॉन मांजा वापरू नका हा केवळ एक इशारा नसून, तुमच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी एक आवश्यक आवाहन आहे.

# एआयचा नवसूर्य आणि भारताची गरुड झेप

**ज्योतिर्मय साहित्य**






९ डिसेंबर २०२५ रोजी मायक्रोसॉफ्ट चे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांच्या भेटीतून साकारलेले नव्या गुंतवणूक धोरणाचे सोनेरी पैलू लक्षात घेण्यासारखे आहे त्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनशैलीत क्रांतिकारक बदल होणार आहेत व लोकांना कल्याणकारी योजना त्यांच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचणार आहेत. भारताकडे विकसित भारताकडे वाटचाल करताना हे एक दमदार पाऊल आहे.

कृत्रिम प्रज्ञा किंवा एआय हे एक उगवते क्षेत्र आहे. या क्षेत्रामध्ये जगाचे भविष्य भारतामध्ये सामावले आहे प्रथम अशी स्पष्ट भूमिका घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतीय उपखंडात कृत्रिम प्रज्ञा प्रसारासाठी कटिबद्ध झाले आहेत. त्यांच्या दृढ संकल्पाचा प्रत्यय नित्य नूतन ध्येयधोरणातून येतो. त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार झाले आहे, आणि भारतामध्ये माहिती तंत्रज्ञानाबरोबरच कृत्रिम प्रज्ञा तंत्रज्ञान सुद्धा गतीने पुढे झेपावत आहे. जागतिक पातळीवर खेळायचा प्रसार वाढणे ही गोष्ट संबंध विकसनशील जगाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे या दृष्टीने विचार करता बिल गेट्स यांच्या मायक्रोसॉफ्ट या कंपनीने भारतात १७.५ दशलक्ष डॉलर्स गुंतवणुकीचा जो प्रस्ताव घोषित केला आहे त्याचे अनन्य साधारण महत्त्व आहे. या संकल्पची आणि ध्येयधोरणाची फलश्रुती काय असेल याची चर्चा प्रस्तुत लेखात केली आहे

नवीन गरुड झेप

लोकसंख्येच्या प्रमाणात एआयचा प्रसार वाढविण्यासाठी मायक्रोसॉफ्ट भारतामध्ये १७.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. त्यामुळे होणारे लाभ बहुआयामी आहेत भारताची लोकसंख्या १४२ कोटी पेक्षा अधिक आहे त्यात तुलनेत एआयच्या प्रसाराची गती मात्र धीमी आहे. ही गती कशी वाढवता येईल हा मोठा चिंतेचा प्रश्न होता, परंतु मायक्रोसॉफ्टचे प्रमुख बिल गेट्स यांची दूरदृष्टी आणि उदार भूमिका यामुळे भारतीय उपखंडाला त्याचा लाभ होत आहे.

मागील वर्षी आशिया खंडात मायक्रोसॉफ्टने या क्षेत्रात तीन अब्ज डॉलर गुंतवणुकीची घोषणा केली होती, यावर्षी ही रक्कम सहापट वाढविण्यात आली आहे.

एआयचे डेटा सेंटर जगभरात वाढत आहेत. त्यात भारताचा क्रमांक वरचा आहे. अशावेळी भारताची या क्षेत्रातील कामगिरी अधिक वर्धिष्णू व्हावी म्हणून मायक्रोसॉफ्टचे प्रयत्न खरोखरच वरदान ठरणारे आहेत. भारतातील ३१ कोटी कर्मचाऱ्यांना इस्रम तसेच राष्ट्रीय करियर सेवा व्यासपीठावर उपस्थिती वाढविण्यासाठी मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांचे प्रयत्न हे ए आय एकात्मिक विकासासाठी फलदायी ठरतील अशी आशा आहे.

**(क्रमशः)**

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-११५



*आजच्या लघुलेखात आपण "काळ्या रंगा" बद्दल जाणून घेवुयात. खरं पाहिलं, तर रंगशास्त्रामध्ये "काळा" आणि "पांढरा" यांना रंग मानतच नाहीत. "काळा" म्हणजे 'अंधार' आणि "पांढरा" म्हणजे 'प्रकाश' किंवा 'उजेड'...!! "काळा" याला अनेक दुषणं दिली जातात. त्याला अशुभ किंवा नकारात्मक म्हणूनही मानले जाते.*

*अमुक एकाचे "काळे धंदे" आहेत; "काळ्या काळजाचा": "काळी जादू":"काळ्या जीभेचा" वगैरे विशेषणांनी युक्त उपमा आपण अनेकदा ऐकतो. ही झाली "काळयाची" एक बाजू जी साधारण नकारात्मक वाटते. "काळ्या" ची दुसरी बाजु देखील पहायला पाहिजे. काळ्या रंगाचे टी-शर्टस् तरुणाईला अधिक प्रिय आहेत, तरुणाईला आकर्षित करतात."बाळाची काळी टीट"; "काळे केस;" "काळा तीळ" हे अधिक प्रिय आहेत.*

*"वास्तुशास्त्र पेंटींग" मधील कांही विशुद्ध रंगांना विविध गडद छटां निर्माण करण्यासाठी, किंवा चित्र संकल्पनातील पुढे-मागे येण्याचे वा जाण्याचे आभास निर्माण करण्यासाठी, "डेप्थ ऑफ फिल्ड" निर्माण करण्यासाठी "काळ्या" चा वापर केला जातो.*

*एकूणच काळ्या रंगाबद्दल सांगायचे झाल्यास शोक, मृत्यु , अंधार यासारख्या नकारात्मक भावनांचं प्रतीक म्हणून त्याची ओळख आहे पण त्याच वेळी शक्ति, अधिकार, भव्यता, गूढता आणि औपचारिकता यांसारख्या सकारात्मक आणि प्रभावी अर्थाचे प्रतीक म्हणूनही 'काळ्या' कडे पाहिले जाते.*

*संस्कृती नुसार तो बदलतो जसे की पाश्चात्य देशात तो शोक दर्शवतो तर भारतीय संस्कृतीत तो उर्जा व भक्तीचा रंग म्हणून मानला जातो. वारकरी संप्रदायात "काळ्या बुक्या" ला धार्मिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.*

*गूढाता आणि अज्ञात; शक्ती आणि अधिकार ; शोक आणि दुःख, तसेच औपचारिकता व अभिजातता, विरोधाभास या भावनांसाठी काळ्याचा वापर केला जातो. ज्यांची जन्म तारिख, ८,१७ किंवा २६ आहे त्यांच्या साठी काळा रंग लाभदायक, ठरतो असे जाणकार सांगतात. तो भव्यता, मजबूत, दृढनिश्चयी चारित्र्याचे प्रतिबिंब आहे.*

क्रमश :

**द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान**
**डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238**




## जात्यावरच्या ओव्या......

सासु सांगते सुनेला
उठ रामाच्या पारी
तुझ्या कष्टान होईल
संसाराची पंढरी ||३९३||

सासू सांगते सुनेला
म्हण जात्यावर गाणं
त्याला ऐकू येत सारं
दगडाखाली त्याचे कान ||३९४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## त्याग आणि सेवेचा आदर्श : भगिनी निवेदिता




### उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

भगिनी निवेदितेने ज्या प्रकारे स्वतःला समर्पित केले होते तेवढा समर्पितपणा क्वचित बघायला मिळतो. तिने मुलींच्या शिक्षणासाठी 'बालिका भवन' म्हणून शाळा सुरु केली. या शाळेसाठी तिने विद्यार्थिनी जमवण्यापासून ते पैसे गोळा करीपर्यंत खूप खस्ता खाल्ल्या. पण ती अंतर्बाह्य किती बदलली होती याची साक्ष देणारा एक सुंदर प्रसंग तिच्या चरित्रात आहे. हेनरिटा मुल्लर या ख्रिश्चन बाई तिच्या शाळेची माहिती कळल्यावर तिच्याकडे आल्या. आणि त्यांनी शाळेसाठी मदत देऊ केली. त्यांची अट एकच होती. मुलींना ख्रिश्चन पद्धतीने शिक्षण द्यावे. शाळेला मदतीची गरज असतानाही निवेदितानी त्या बाईंची मदत नम्रपणे आणि बाणेदारपणे नाकारली आणि मला कालीमातेच्या कृपेने काही कमी पडत नाही. मी हिंदू आहे आणि या माझ्या मुली आहेत असे सांगून पैसे घ्यायला स्पष्ट नकार दिला.
कोलकात्यातील सर्वसामान्य जनतेला त्यांच्याविषयी खूप आदर आणि जिव्हाळा वाटू लागला.आणि त्यांच्याकडे मोठ्या आशेने लोक पाहू लागले.






पुढे निवेदितानी खूप कार्य केले. विशेषतः स्वामीजींच्या देहावसानानंतर त्यांनी स्वामीजींच्या कार्याला वाहून घेतले. अनेक पुस्तकांचे लेखन केले. अनेक विषयांवर व्याखाने दिली आणि लोकांना हिंदू धर्माची तत्वे समजावून सांगितली. स्त्रियांच्या उद्धारासाठी मोठे कार्य केले.पुढे त्या योगी अरविंदांच्या सहवासात आल्या. त्यांच्याशी अध्यात्मिक तसेच देशातील पारतंत्र्याच्या परिस्थितीवरही चर्चा केली. आणि स्वातंत्र्यासाठी सुद्धा मोठे कार्य केले. स्थानिक वृत्तपत्रांमध्ये इंग्रज सरकार विरुद्ध लेख लिहिले. त्याचा एवढा परिणाम झाला की इंग्रज सरकारने गुप्तहेर नेमून त्यांच्या हालचालींवर पाळत ठेवली.

त्यांच्या विद्वत्तेमुळे, व्याख्यानांमुळे त्यांचा बंगालमधील अनेक मोठमोठ्या व्यक्तींशी परिचय झाला होता. रवींद्रनाथ टागोर, त्यांचे बंधू अवनीन्द्रनाथ, ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यासारख्या अनेक मंडळींशी निवेदितांचे अतिशय सौहार्दपूर्ण संबंध होते. जगदीशचंद्र बसूंचा पहिला ग्रंथ रिस्पॉन्स इन द लिविंग अँड नॉनलिविंग लिहिण्याच्या कामात त्यांनी मोलाची मदत केली. तसेच त्यांनी केलेल्या टिप्पणीच्या आधारे निवेदितानी प्लांट रिस्पॉन्स मिन्स ऑफ फीसियॉलॉजिकल इन्वेस्टीगेशन हा पूर्ण ग्रंथ लिहिला.

बसूंचे दोन ग्रंथ ' कंप्रॅटिव्ह इलेक्ट्रो – फीसियॉलॉजि,' रिसर्चेस ऑन इर्रीताबीलिटी ऑफ प्लांट्स ' निवेदितानीच लिहिले आहेत. १३ ऑक्टोबर १९११ रोजी त्यांनी आपला इहलोकीचा प्रवास संपवला. त्यांचे कार्य युवकांना स्वामीजींच्या कार्याप्रमाणेच सदैव प्रेरणादायी राहील.



### दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सारशोधन

**ज्योतिर्मय साहित्य**

दशक ६ समास ९

नमस्कार

माझ्या मते समर्थानी या समासात समाजातील प्रत्येक गोष्टींचा बारकाईने तपशील सांगितला आहे. आपण आपल्या व्यवहारी जगात जे जे पहातो ते ते समर्थानी मांडले आहे ''आपण कसे असावे व कसे नसावे''

हे ज्याचे त्यांनी ठरवावे पण एकदा का तुम्हाला परमार्थाची गोडी लागली की सारासार विचार करून जीवन जगण्याची कला तुम्हाला सापडेल त्यासाठी संतवचनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.


मित्रांनो या समासात आत्मानुभवाचे तसेच थोडक्यात पण अतिशय रहस्यपूर्ण वर्णन ''सारशोधन''या समासात आपण अभ्यासणार आहोत.

समर्थ म्हणतात संसाराचा त्याग न करता,प्रपंचात रमून देखील माणूस वैचारिक बुध्दीच्या जोरावर केवळ सुक्ष्म विचाराने आत्मज्ञान अनुभवू शकतो. याच जन्मामध्ये मनाने संसारातुन अलग होऊन स्वस्वरूपाकार होता येते. हे केव्हा शक्य आहे तर मग मित्रांनो आपल्या

बुध्दीच्या जोरावर वाणी,विचार, सारासार विवेक,समोरच्याला न दुखवता केवळ आत्मसंपन्न होणे व देहीची विदेही दशा भोगता येते. व निर्गुण देवाशी अनन्यपणाने रहाता येते. व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सर्व काही करून आपले अकर्तेपण राखुन ठेवणे म्हणजेच परमात्म्याशी एकरूप होणे होय. नाही तर आपण समाजात पहातो की ''मी''पणा अंगाखांद्यावर मिरवणारी माणसं आपण हरघडी बघतो. पण तो कर्तेपणा सोडून देऊन त्यांना आपल्या वाट्याला आलेले कर्म निसंकोच,कुठल्याही प्रकारचा हव्यास न करता कुठल्याही प्रकारचा बडेजाव न करता परमार्थ करतो तो खरा परमात्म्याशी एकरूप होतो त्याची सेवा सद्गुरूच्या पर्यन्त पोहचते.

आपल्या या विश्वामध्ये सगुण व निर्गुण, द्रुष्य व अद्रयुष्य, स्थुल व सुक्ष्म, विशेष व सामान्य, माया व ब्रम्ह,सार व असार एकत्र असतात. आपण तर सामान्य माणसं आहोतच चांगले वाईट याचा विचार करून आयुष्य जगत परमेश्वर रूपाची आठवण सतत लक्षात ठेवली पाहिजे. जीवनात प्रत्येक ठिकाणी असार सांडून किंवा सोडून देऊन सार घ्यावे लागते. असार हे वरवरचे कवच आहे तर सार हे अंतरंगातील रहस्य आहे. यालाच ''सारासार विचार''म्हणतात. जेव्हा तुमच्या मनी सारासार विचार करण्याची वैचारिक बैठक तयार होते व यालाच सत्संग असे म्हणतात. परमात्मा वेगळा खरा पण तो अंतर्यामी व्यापून रहावा यासाठी संतांच्या संगतीत राहून गुप्त परमात्मा शोधून काढण्यासाठी प्रयत्न करावेत. **(क्रमशः)**

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति – आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।



## || कृष्णतत्व ||

सौ उज्वला धर्माधिकारी
पुणे

**ज्योतिर्मय साहित्य**

पहाटे कोंबडा बांग देतो. तेव्हा शेतकरी राजा आपल्या दिवसाची सुरुवात करतो.आपण सर्वसामान्य जनता पण त्याचवेळी पहाटे उठते. परब्रम्हाच्या आज्ञेने आपला दिवस सुरू होतो.

तसेच सुर्यनारायणाचे आहे तो काही प्रकृतीच्या वेगवेगळ्या गुणांनी युक्त असलेल्या मी पणाने एक असून अनेक पणाने जगातील प्राणीमात्रं प्राणरूपाने जिवंत असतो. तेव्हा त्या सुर्यनारायणा जवळ कोणताही भेद नसतो. मग माणसंच खोट्या प्रतिष्ठेच्या अहंकाराच्या डबक्यात साठून का बरं रहातात! असा मला बाळबोध प्रश्न पडतो.

गरिबश्रीमंत, सुंदर कुरूप, आजकाल तर जातीजातीत जे बिनडोकी स्तोम माजवले जात आहे. त्यांनी तर समाजमन दुभंगले जात आहे. यासाठी कृष्ण तत्वांची ओळख करणे गरजेचे आहे. सुर्याची स्थिती पाहिली चंद्राचे योगदान पहाणे महत्वाचे आहे ना+++

चंद्र कधी म्हणतो का मी फक्त श्रीमंतांच्या घरी रहाणार!!

यावत चंद्र दिवाकर हे जसे सर्वांच्या साठी आहेत ते आपण का समजून घेत नाही.

यासाठी कृष्ण तत्व समजून घेणे गरजेचे आहे.

दया, क्षमा, शांती जिथे वास करतात तिथे देवत्व वास करते.

जेव्हा निराकार स्वरूप प्रगट होते तेव्हा नाना रूपे लय पावतात वर्ण व्यक्त नाहिशा होतात व जातीपातिचे भेदही रहात नाहीत. सुख संपत्तीचा लोभ हा क्षणीक आहे .त्यावर विजय मिळवणे ही सोपी गोष्ट नाही, त्यासाठी तत्त्वनिष्ठा महत्वाची आहे.

परमात्म्याच्या प्रांगणात जिवंतपणी खेळ खेळणारे आपण सगळे खेळगडी आहोत ही वासना मनाशी घट्ट धरून ठेवली व सतत जगत्कल्याणाचाचं विचार केला तर हे जगणं म्हणजे एक प्रकारची आनंद यात्राचं होणार आहे. या आनंद यात्रेचा मी एक आजन्म वारकरी आहे. हे मनास ठसवणे गरजेचे आहे.आतापर्यन्त अनेक संस्कृती उदयाला आल्या त्यांनी राज्य केले व परत त्यांचा अस्तही झाला.

या सर्वावरून एक बोध घेऊ शकतो की !

जेव्हा जगाची पुन:निर्मिती करण्यासाठी संस्कार रूप वासना शक्ति धारण करून ज्या ठिकाणी देव रहातात त्या स्थानाला कल्पांती मनोमन भजावे. तिथे श्रीकृष्ण अस्तित्व नक्कीच सापडेल.

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरू पायी ।
अध्यापन गुरू करिती शिष्यही अध्यायना उदयीं ।
याज्ञिकजन यज्ञकुंडि आहुती टाकितात पाहीं ।रविप्रभा पडुनिया उजळल्या शुध्द दिशा दाही ।
मुनिजनमानसहंसा श्रीमन : कमलभृंगा ।
मुरहर पंकजपाणी पद्मनाभ श्रीरंगा ।
शकटांतक सर्वेशा हे हरिप्रतापतुंगा ।
कोटिरवींहुनि तेज आगळे तुझिया वदनाला । नित्यानंद ध्यातसे हृदयि नाममाळा
ॐ नमो भगवते वासुदेवाय

**(क्रमशः)**

## || समृद्ध मराठवाडा ||

माधव सूर्यवंशी,
माकणीकर
(मो. 9527853953)



**ज्योतिर्मय साहित्य**

गोवावरीसह मांजरा,पूर्णा व या नदयांच्या उपनदया मराठवाडयासाठी जलस्त्रोताच्या धमन्या आहेत. अशा जलस्त्रोतावर पैठण येथील गोदावरील नदीवरील जायकवाडी धरण, मांजरा नदीवरील धनेगांव धरण, पूर्णा नदीवरील येलदरी धरण, नांदेड येथील गोदावरी नदीवरील विष्णुपुरी धरण, माजलगांव येथील सिंदफणा नदीवरील धरण, बीड येथील बिंदुसरा नदीवरील बिंदुसरा धरण, नळदूर्ग येथील बोरी नदीवरील बोरी धरण त्याव्यतरिक्त निम्न दुधना प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेली धरणे, निम्न तेरणा प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेली धरणे हे मराठवाडयासाठी पाण्याचे स्त्रोत आहेत.

मराठवाडा प्रदेश म्हणजे प्रमुखत: कोरडवाहू जमीनीवर अवलंबुन असलेला प्रदेश, त्यामुळे खरीप हंगामाची पिके जसे- ज्वारी, मुग, उडीद, सोयाबीन, तूर, हरभरा, गहु, कापूस, भुईमुग इत्यादी पिके आहेत. ज्या जागेवर सिंचनाच्या सोयी उपलब्ध आहेत तिथे बागायती शेतीमध्ये फळझाडे, ऊस, हळद, अद्रक अशा पिकांचा समावेश आहे. त्या भागामध्ये जे पिक पिकते त्यानुसार त्या त्या भागात बाजारपेठा प्रसिध्द आहेत. अलिकडे बागायती जमीनीचा कल वाढलेला आहे. त्यामुळे साखर कारखानदारी मोठया प्रमाणात वाढलेली आहे.

मराठवाडयाची राजधानी छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक क्षेत्र मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देणारे आहे. त्यामुळे मराठवाडयासह विदर्भ व खानदेशातील युवकांना मोठया प्रमाणात येथे रोजगार उपलब्ध होतो. औद्योगिकरण सुरु झाले म्हणजे कच्च्या मालापासून पक्क्या मालामध्ये उत्पादन सुरु झाले. वाहन उद्योग, मेडीसीन उद्योग, वाईन उद्योग यासह अनेक उद्योगनिर्मीती येथे सुरु झाली आहे. जालना येथील स्टील इंडस्ट्री मोठी प्रसिध्द आहे.

वरील सर्व गोष्टीव्यतिरिक्त शैक्षणिक क्षेत्रामध्ये मराठवाडयातील कांही शैक्षणिक संस्थांनी मोठी झेप घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, परभणी येथील कै. वसंतराव नाईक परभणी कृषी विद्यापीठ, नांदेड येथील स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ या अंतर्गत अभियांत्रिकी, वैद्यकीय् कृषी, वाणिज्य, कला व सांस्कृतिक शिक्षणांची अनेक नामांकित महाविद्यालये मराठवाडयात आहेत. त्यात शिक्षणाचा लातूर पॅटर्न प्रसिध्द आहे.

**(क्रमशः)**



### आरोग्य संजीवनी

## दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

**ज्योतिर्मय साहित्य**

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

खुप काम आहे, असे म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकते. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकता तसेच कार्यक्षमतेवर देखील वाईट परिणाम होऊ शकतो काही व्यक्ती वजन कमी करण्यासाठी जेवण टाळात पण आरोग्यासाठी हे घातक आहे. हे आहेत दुष्परिणाम.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

चक्कर येणे.

भुकेले राहिल्याने अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

ताण-तणाव.

भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

लठ्ठपणा वाढतो.

भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केल्यास, वेळी-अवेळी खाल्लास, वजन वाढते, म्हणजे लठ्ठपणा वाढतो... वेळेत जेवण न केल्याने चयापचय प्रक्रिया बिघडते व फॅट्स शरीरात जमा होतात, यामुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. तेव्हा वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तरं, भूक लागेल तेव्हा वेळेवर योग्य-पौष्टिक आहार घ्या आणि किमान २० मिनिटे व्यायाम करा...

मेंदूचे कार्य बिघडते.

ग्लुकोजच्या मदतीने मेंदूचे कार्य सुरू असते. यासाठी योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा रक्तातील साखरेची पातळी खालावते. लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता कमी होते.

चिडचिड.

भुकेमुळे जास्त चिडचिड होते. रक्तातील साखरेची पातळी खालावल्याने मेंदूप्रमाणे तुमच्या मूडवर याचा परिणाम होतो...

***

# कृष्णाचे विश्वरूप दर्शन - कृष्णार्पण

ज्योतिर्मय साहित्य

परवा ज्येष्ठ कवी श्री माणिक महाजन यांच्या एका काव्य प्रकाशन सोहळा कार्यक्रमाला माझे पती श्री. गिरीश जी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तिथेच सौ.मंजुश्री चिप्पलकट्टी ताई या ही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तेथेच त्यांची एकमेकांची ओळख झाली आणि सौ मंजुश्री ताईंनी गिरीशजींना त्यांचा कृष्णार्पण काव्य संग्रह भेट दिला, आणि एक नितांत सुंदर पुस्तक आमच्या घरी आले आणि माझ्या हातात पडले.


काव्य संग्रहाचे मुखपृष्ठ पाहता मी खूप भारावले. मला काही पुस्तक सोडवेना. निळया, सावळ्या रंगावर झाडाखाली श्रीकृष्ण बासुरी वाजवत आहेत. असे देखणं चित्र मुखपृष्ठावर आहे. पाहता क्षणी कुणीही प्रेमात पडावं एकदी असंच.

आणि मला अचानक एका हिंदी गाण्याच्या ओळी आठवल्या, त्या म्हणजे,

जिसकी रचना इतनी सुंदर
वो कितना सुंदर होगा?

अर्थात येथे या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ इतके सुंदर आहे तर आतील रचना किती सुंदर असतील?

याची कल्पनाच पुस्तक खाली ठेवू देत नव्हती.




या काव्य संग्रहाचे नाव आहे,''कृष्णार्पण''. किती सुंदर नाव. कृष्णाला अर्पण. या संग्रहात एकोणचाळीस कविता आहेत.

हा काव्यसंग्रह वाचताना कवयित्रीचे अफाट वाचन असल्याचे जाणवले. आणि तेवढेच त्यांचे लेखन ताकदीचे आणि समर्पक आहे, याची जाणीव झाली.

कवयित्री सौ.मंजुश्री चिप्पलकट्टी या कृष्णभक्त आहेतच... कृष्ण आणि महाभारत यावर त्यांचा गाढा अभ्यास आहे. कृष्ण हा हळवा कोपरा आहे. कृष्णप्रेम हे कवयित्री मंजुश्री चिप्पलकट्टी यांच्या मनातील भक्ती, प्रेम, आदर कृष्णाशी त्यांचं असलेले नातं, या भावना त्यांच्या लेखणीतून व्यक्त होतात. कृष्णावर असलेलं कवयित्रीच नितांत प्रेम त्यांच्या लिखाणातून स्पष्ट होतं .

त्यांच्या कविता वाचताना कवितातून कृष्ण,

रुणू झणू वाळा वाजवित...
लेकुरवाळा कान्हा खेळतो,

तर, कधी पेंद्याचा खोडकर मित्र म्हणून, तर कधी राधेचा शाम बनून आपल्याला भेटतो.

आणि मग कवयित्रीचे मन त्या तान्ह्या बाळकृष्णा सभोवती घुटमळत आहे. त्या लिहितात,

तुझ्या पायरीशी मन
माझे सारखे घोटाळे
कधी येशील घरात?
वाजवित बाळा वाळे

किती सुंदर ओळी आहेत.

लहानपणापासून असलेली वाचनाची आवड जपत त्यांनी ''कृष्णार्पण'' हा काव्य संग्रह अतिशय उत्कटतेने लिहिला असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

एक एक काव्य म्हणजे एक अनमोल मोती असावा, असे वाटते.

आस नावाची सुंदर कविता या संग्रहात आहे, ती अशी

माझा देह हे मंदिर
माझे ह्दय गाभारा
मनाच्या या सिंहासनी
असू देत तुझा थारा

या ओळी मला फार भावल्या. किती प्रामाणिक अगतिक इच्छा आहे, आस आहे.. माझ्या मनाच्या गाभाऱ्यात सतत तुझा वास असावा..किती निर्मळ भावना आहे ती येथे दिसून येते.

कवयित्री अगदी सात्विक स्वभावाच्या आहेत हेच यातून जाणवते.

याच कवितेतील पुढील काही ओळी आणखी सुंदर आहेत.

माझ्या मनाचे प्रांगण
तुझ्या विचारांचा धेनु
भक्ती कस्तुरी सुगंध
तुझे सूर मीच वेणू

या कडव्याला खरोखरच कस्तुरीचा सुगंध आहे. आस या कवितेतील सर्व ओळीतून कृष्णासाठी आतुरलेले निर्मळ मनाची घालमेल जाणवते.

या संग्रहात राधाकृष्ण नावाच्या कवितेत सावळ्या कृष्णाचे कृष्णरंगात रंगलेली रात्री राधेला प्रितीची बाधा होते. आणि चंद्राची प्रभा गौरवर्णी राधेवर कशी सुरेख खुलून दिसते? याचे वर्णन आहे.

श्रीकृष्ण म्हणजे श्री विष्णूचे आठवा अवतार आहे.

सौ.मंजुश्री चिप्पलकट्टी यांची अद्वैत या कवितेमध्ये द्वैत अद्वैताचा खेळ अद्भुतपणे वर्णन केला आहे. त्या कृष्णाला म्हणतात,

मी गीत तुझे गाताना
थोडीशी हळवी होते
तुझे हसू हसताना
थोडीशी सावली होते

देवरूपी श्रीकृष्ण आणि मनुष्य रुपी सौ मंजुश्री ताई यांचं नातं द्वैत रुपी आहे. एकरूप होऊन गेलं आहे.

मज स्थळ काळ वेळेचे
नाहीच उरले भान
आठवीत तुझ्या श्रीहरी
होते कशी बेभान

बेभान होऊन कवयित्रि कृष्णरंगात रंगुन गेल्या आहेत. भान हरपून श्री कृष्णाची भक्ती करत आहेत. श्री कृष्णाची बुद्धी,भक्ती, ज्ञान, वाणी उच्चार, निर्धार, लेखणी सारं समजून, उमजून लिहिणं सामान्य व्यक्तीला सोपे नाही. मंजुश्री ताईंचा महाभारत या विषयीचा अभ्यास वाखाणण्या जोगा आहे. हे त्यांच्या कवितांनी दाखवून दिलं आहे.

एका कवितेत राधा म्हणते,

कृष्ण होऊन पाहते
जणू पाहते दर्पणी
गौरवर्णी सखा कृष्ण
राधा पुजते मनोमनी

पुढे एका कडव्यात

राधा शोधते ह्रदयी
कोण कृष्णाच्या ते वसे ?
दिसे ह्रदयात राधा
राधेमध्ये विश्व दिसे

हे एक प्रगल्भ लेखणीतूनच येऊ शकत.

एक एक कविता वाचत समजून उमजण्याचं मी प्रयत्न करत होते. जसं जसे कविता वाचत गेले तसं तसे.. मी अजूनच त्यात गुंतत गेले.

मला माझेच जुने दिवस, अगदी लग्नाआधीची दिवस आठवले.. तेव्हा पुस्तक हातात घेतलं की संपेपर्यंत चैन पडत नसे. अगदी तसेच आज

पुस्तक परिचय
सौ.रचना गि. वसेकर
पुणे ९४२२१७५७४९



एवढ्या वर्षांनी मी कृष्णार्पण वाचत होते.

शाम रंगी रंगताना, रास, मुक्ती अश्या अनेक कविता वाचल्या त्यानंतर अजून एक आवडलेली कविता... सवतींच भांडण ही कविता सुंदर आहे.

सहा बायकांचा दादला
एका देहात बसला
जीव पस्तावाला तरी
मरेस्तोवर नांदला.

सहा षडरिपुंचा निवास एकच देहात असतो आणि मरेपर्यंत त्याच देहात राहतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या माणसात असलेल्या भावनांचा निवास देह रुपी घरात राहून आपले काम करतो.पश्चाताप झाला तरी देहाला सोडून जात नाही. शरीर मृत झाल्यावरच षडरिपु त्यासोबतच जातात.

अतिशय सुंदर रीतीने कवयित्री येथे व्यक्त झाल्या आहेत.

त्यानंतर रुक्मिणीचे पत्र ही एक कविता अशी, रुक्मिणी श्रीकृष्णाला पत्र लिहिते, ही कृष्णा माझ्या वडिलांनी माझे लग्न मला न विचारता शिशुपालाशी लावलेले आहे. आणि मी लग्ना आधीपासूनच मनोमनी पती म्हणून तुलाच वरलेले आहे. त्यामुळे तू लवकर येऊन मला येथून घेऊन जा.

अश्या प्रकारचं पत्र रुक्मिणी कृष्णाला मनातील आर्त भावना वर्णन करताना लिहिते.

ना येशील जरी, तरी जराही
दोष ना तुज लागेल
निष्कलंक तुझी किर्ती
दुःख माझे माझ्या सवे जाईल

हे ही कृष्णाला सांगते. त्यातून रुक्मिणीचं दुःख विषद होते.

कृष्ण द्रौपदी नाते, कृष्ण सुदामा, सूर्यास्त या कवितेमधे दुर्योधन आणि श्रीकृष्ण यांच्यातील संवाद वाचताना वाचणाऱ्याला कुरुक्षेत्रावर नेऊन पोहोचवतो, ही कवयित्रीच्या लेखणीची ताकद आहे.

पुढच्या कवितेत श्री कृष्णाचे विश्वरूप दर्शन दाखवले आहे. कुरुक्षेत्रावर उभे असताना समोर असलेल्या सैन्यात पितामह, गुरू, भाऊ, मित्र उभे असताना हे माधवा, मी माझ्याच माणसांविरुद्ध कसे शस्त्र उचलू?

मला असे करणे शक्य नाही, माझा घसा सुकला, हातपाय गळाले.असे अर्जुन म्हणत होता. माझ्या घरचे हे सगळे आप्तेष्ट आहेत.या प्रसंगी घनश्याम कोपला आणि कृष्ण म्हणाला, मी अनंत, अव्यय मीच आदी आणि अंती मीच आहे. असे म्हणून श्री कृष्णाने आपले विश्वरूप दर्शन दिले. अनेक उदाहरणे आणि धर्म आणि कर्माचे दाखले देऊन पटवून दिले.तेव्हा कुठे अर्जुनाने माफी मागितली आणि युद्धला तयार झाला. अशी ही विश्वरूप दर्शन ही कविता आहे.

निर्वाण, या कवितेत श्रीकृष्णाची जीवन यात्रा संपण्याची वेळ. कर्मभूमी सोडायची वेळ. कविता वाचून मन विषण्ण होत. वाचताना डोळ्यातून अश्रू येतात. द्वापार युग संपतं.

येथे पाप पुण्याचा हिशोब झाला. नाते आणि कर्म फल याबद्दल सांगून झालं, आता निघण्याची वेळ आली. ती सृष्टीला ही कळाली. कृष्ण झाडाखाली बसलेला होता पण आज काही वेगळाच भासत होता. सूर्यास्त होताना हे दृश्य जरा वेगळं वाटलं. कृष्णाची बासरी नव्हती, सूरही नव्हते. गायी दूरवर चरत होत्या, चेहऱ्यावर असलेले मिश्किल हास्य नाही.

कदंब वृक्षाखाली निर्विकार पणे कृष्ण बसलेला आणि कदंब वृक्षाला खांदे टेकवून गिरिधरा आपला भार वृक्षावर सोपवून मोकळा झाला, अंतिम क्षणी.

मन खरोखरी दुःखी होतं.

किती वेगवेगळे पैलू मधुसूदनाचे वाचले आणि आता ही निर्वाण ही कविता.

मन भाव विव्हल झालं. बराच वेळ काहीच सुचेना.

यावेळी लहानपणी आजीने शिकविलेला एक श्लोक आठवला. **(क्रमशः)**




## गुरु वायूर येथील श्रीकृष्ण मंदिर

ज्योतिर्मय साहित्य

गुरु , वायू व उर(म्हणजे भूमी)म्हणजे गुरु व वायू यांना सापडलेली पवित्र भूमी, या नावाने गुरुवायूर या शब्दाची घडण झाली आहे.



इतीहास

चीर राजांनी व नंतरच्या कोचीन राजांनी मंदिराचे संरक्षण भरघोस दान करून केले. १७५५ मध्ये ममंकोळ संघर्षात मंदिराला हानी झाली. पण नंतर पुनर्बांधणी सुद्धा झाली. १९७० साली या मंदिरात प्रचंड आग लागली होती. सर्व मंदिर जळून खाक झाले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की मुख्य विग्रहाला किंचितही हानी झाली नाही.

*ड्रेसकोड* या मंदिरात प्रवेश करण्यासाठी पुरुषास धोतर किंवा लुंगी घालावी लागते( व बनियन आणि शर्ट काढून ठेवावा लागतो). महिलांना पारंपारिक वेशातच केवळ मंदिरात प्रवेश करता येतो.

मंदिरातील सण व उत्सव

गुरु वायर एकादशी किंवा व यालाच वैकुंठ एकादशी किंवा मोक्षदा एकादशी असेही म्हणतात ही मार्गशीर्ष महिन्याच्या शुक्ल पक्षात येते हा येथील सर्वात मोठा उत्सव असतो या दिवशी मंदिरात दर्शनासाठी २४ तास मंदिर उघडे ठेवले जाते. विल कट्टू हा दीप प्रज्वलनाचा सोहळा खूपच आकर्षक असतो.

कृष्ण जन्माष्टमी

या उत्सवात भगवंताची विशेष अलंकार महापूजा होते तसेच भक्तिमय नृत्य आणि शास्त्रीय संगीताची मैफल ही इथे आयोजित केल्या जाते दहा दिवस पर्यंत हा उत्सव चालतो या काळात हत्तीची शोभा यात्राही निघते आरती भजन नाम घोष अशी सर्वत्र धमाल असते.

चेंबई संगीत महोत्सव

महान गायक चेंबई वायोमा सुब्रमण्यम अय्यर यांच्या स्मरणार्थ येथे संगीत उत्सव होतो. शंभरहून अधिक संगीतकार येथे कार्यक्रम साजरा करतात.

गुरुवायूर चे गजराज आनंदवनम्

मंदिरात ५० हून अधिक हत्तीचा कळप आहे. वेळोवेळी भक्त नवस फेडण्यासाठी मंदिराला हत्ती समर्पित करतात. असे आजवर छप्पन हत्ती इथे जमले आहेत. दिवसातून तीन वेळेस सिवेली म्हणजे हत्ती द्वारा मंदिराची प्रदक्षिणा करण्यात येते. यात दररोज केवळ तीन हत्ती दागिन्या सहित सजवून आणि भगवंताची सुवर्ण प्रतिमा घेऊन मंदिराची प्रदक्षिणा घालतात व शेवटी भगवंताला बाहेरूनच नमस्कार करतात. ही मिरवणूकही खूप पाहण्यासारखी असते. मंदिराचे सर्व हत्ती मंदिरापासून जवळच तीन किलोमीटरवर आनंदवन या स्थळी ठेवले जातात. शोभा यात्रेच्या वेळेस सर्व शहरभर या हत्तींची शोभायात्रा काढल्या जाते.

**(क्रमशः)**

# अंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये भेलकेच्या विद्यार्थ्यांची बाजी

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आकुर्डी येथे झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन पॉवर लिफ्टिंग स्पर्धेमध्ये शंकरराव भेलके महाविद्यालयाच्या पोर्णिमा कांबळे हिने ५७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला, स्मृती बोरुडे हिने ७६ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवला काजल गायकर हिने ४७ वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळवला सायली उबाळे हिने ४७ वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवला सर्व खेळाडूंचे संस्थेचे मानद सचिव ऍड. संदीप कदम, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, उपसचिव एल.एम.पवार, सहसचिव (प्रशासन) ए.एम.जाधव, महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ तुषार शितोळे, शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. पौर्णिमा कारळे, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व प्रशासकीय कर्मचारी यांच्यातर्फे अभिनंदन करण्यात आले तसेच सर्व खेळाडूंना पुढील वाटचाली करता शुभेच्छा दिल्या.

# एअर मार्शल प्रदीप बापट (नि.) यांना मानद डॉक्टरेट

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – येथील एअर मार्शल प्रदीप बापट ( निवृत्त) यांना इंफाळ, मणिपूर येथील बिर टिकेंद्रजित विद्यापीठाने प्रतिष्ठेची व सन्मानाची अशी समजली जाणारी मानद डॉक्टरेट (तत्वज्ञान) हॉनररी डॉक्टर ऑफ फिलोसोफी ही पदवी जाहीर केली आहे. एअर मार्शल प्रदीप बापट ( निवृत्त ) यांच्या देशसेवेतील अपूर्व योगदानाच्या कार्याचा हा बहुमान आहे.

एअर मार्शल प्रदीप बापट ( निवृत्त) ह्यांना परम विशिष्ट सेवा मेडल ने राष्ट्रपती यांच्या हस्ते यापूर्वी गौरविण्यात आले असून ते अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष आहेत. प्रदीप बापट यांना मध्यप्रदेश सरकारने मध्यप्रदेश अलंकार रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.प्रदीप बापट हे आंतरराष्ट्रीय सायकल पोलो खेळाडू असून त्यांनी आंतरराष्ट्रीय सायकल पोलो स्पर्धेत भारताचे नेतृत्व केले आहे.ते अखिल ''भारतीय सायकल पोलो'' संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.


''स्वरूप वर्धिनी'' चे प्रदीप बापट संचालक पण आहेत.




अनेक सामाजिक संस्थांचे प्रतिष्ठित पुरस्कारही यापूर्वी त्यांना प्राप्त झाले आहेत.

मणिपूर येथे होणाऱ्या पदवीदान समारंभामध्ये त्यांना हॉनररी डॉक्टर ऑफ फिलोसोफी ही मानद पदवी मणिपूर राज्याचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांचे हस्ते विद्यापीठाच्या ''महाराजा गंभीर सिंह मेमोरियल हॉल'' मध्ये संपन्न होणाऱ्या भव्य पदवीदान कार्यक्रमात प्रदीप बापट यांना सन्मानपूर्वक पदवी प्रदान करण्यात येणार आहे.






# जळगावी रंगणार तिसरे अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलन

(पान एक वरून)

**ज्योतिर्मय साहित्य**

स्व प्रा पन्नालाल भंडारी, स्व सौ बदामबाई हेमराज देसर्डा यांच्या स्मरणार्थ सूर्योदय साहित्य गौरव पुरस्कार

माजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख (पुणे)

सूर्योदय यतींद्र चांदवडकर साहित्य पुरस्कार

प्रा डॉ सतीश बडवे(छत्रपती संभाजीनगर) व प्राचार्य रमेश जलतारे (पांढरकवडा जि यवतमाळ )

''गोधडी''कार अण्णासाहेब देशमुख यांच्या स्मरणार्थ सूर्योदय साहित्य पुरस्कार

प्रा डॉ फुला बागुल (शिरपूर), डॉ विनोद गोरवाडकर (मालेगाव), राज्यस्तरीय सूर्योदय श्री दलुभाऊ जैन साहित्य पुरस्कार - चांगदेव काळे (ठाणे). सूर्योदय ज्ञानरत्न पुरस्कार - माजी कुलगुरू प्रा डॉ आर एस माळी., सूर्योदय जीवन गौरव पुरस्कार - प्रा डॉ प्रभाकर जोशी (अमळनेर).,

सूर्योदय शिक्षणरत्न पुरस्कार - प्रा शरदचंद्र छापेकर (जळगाव)., सूर्योदय जीवनव्रती पुरस्कार

- एस पी कुळकर्णी (धरणगाव)., सूर्योदय समाज दर्पण - ॲड मोहन शुक्ला (एरंडोल)., नागनाथ कोत्तापल्ले सूर्योदय साहित्य पुरस्कार - प्रा डॉ युवराज मानकर (यवतमाळ)., सूर्योदय कलारंग पुरस्कार - अभिनेत्री, लेखिका अपूर्वा सोनार (यवतमाळ)., सूर्योदय सेवारत्न पुरस्कार- प्रा डॉ दिलीप लोखंडे (साक्री)., सूर्योदय बालमित्र पुरस्कार - बबन शिंदे (कळमनुरी जि हिंगोली).,

सूर्योदय शब्ददीप पुरस्कार - प्रा सचिन देवरे (पाचोरा)., हबीब भंडारे (छत्रपती संभाजीनगर)

नंदकिशोर ठोंबरे (नाशिक), शहादेव सुरासे (पैठण)

सूर्योदय अक्षररत्न पुरस्कार- प्रा डॉ रवीप्रकाश चापके (पुसद जि यवतमाळ), प्रा डॉ सतीश मस्के (साक्री), विजयसिंग राजपूत (पाचोरा), आर डी कोळी (जळगाव)

सूर्योदय काव्यरत्न पुरस्कार - अशोक भालेराव (नाशिक), प्रल्हाद कोलते (मुंबई), प्रशांत पनवेलकर (वर्धा), नरेंद्र पाटील (धुळे), मिना सैंदाणे (जळगाव) शेख मोईन (मालेगाव), सूर्योदय शब्दमाऊली पुरस्कार - पुष्पा साळवे (जळगाव)

छाया बेले (नांदेड), सूर्योदय अक्षर लेखन पुरस्कार-

अनिल पाटील (जळगाव ह मु मुंबई), प्रमोद पाटील (कासोदा)., सूर्योदय शब्दरत्न पुरस्कार - गोकुळ बागुल (अमळनेर), पापालाल पवार (धुळे)

सूर्योदय कलायात्री पुरस्कार - हर्षल पाटील (जळगाव), सूर्योदय अक्षरदीप पुरस्कार - प्रा डॉ प्रवीण घोडेस्वार (नाशिक), सूर्योदय गोदा साहित्य गौरव पुरस्कार - देविदास खडताळे (नाशिक),

सूर्योदय गिरणा साहित्य रत्न पुरस्कार - शोभा बडवे (मालेगाव जि नाशिक), सूर्योदय काव्यसरिता पुरस्कार - संध्या प्रशांत भोजने (नाशिक), सूर्योदय शब्दरंग पुरस्कार - अ फ भालेराव(मुक्ताईनगर)

स्व उमादेवी शर्मा यांच्या स्मरणार्थ सूर्योदय साहित्य पुरस्कार - प्रा विमल वाणी (म्हसावद), शैलजा करोडे (जळगाव ह मु मुंबई), सूर्योदय काव्यगंध पुरस्कार - दिनेश गावंडे (अकोला), कैलास करंके (शिरपूर), सूर्योदय अक्षरसेवा पुरस्कार - किशोर कुलकर्णी (जळगाव), खानदेशस्तरीय सूर्योदय साहित्य पुरस्कार - मनोहर आंधळे (चाळीसगाव)

सूर्योदय गिरणा गझल पुरस्कार - अजय बिरारी (नाशिक), खानदेशस्तरीय सूर्योदय काव्यगंध पुरस्कार - गो शि म्हसकर (नगरदेवळा), अनिल शिंदे (जळगाव)

साहित्य कृतींना पुरस्कार

स्व सौ.जिसकुँवर भगवानसिंग गिरासे यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय सूर्योदय साहित्य पुरस्कार -

प्रा बी एन चौधरी (धरणगाव) यांच्या कस्तुरीगंध या कथासंग्रहाला.

स्व सर्जेराव पाटील यांच्या स्मरणार्थ सूर्योदय गझल पुरस्कार - सुनीती लिमये(पुणे) यांच्या दिवसांची पाने या गझल संग्रहास तर मोहन काळे (नवीन मुंबई) यांच्या अखेर मी माझीच समजूत घातली या काव्यसंग्रहाला.

स्व कॅ रश्मी मुठे यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय सूर्योदय वाड्.मय पुरस्कार - माणिक पुरी (नागपूर ) यांच्या तळे पक्षी आणि माळरान तसेच डॉ संगीता म्हसकर (पुणे) यांच्या इंद्रधनुष्य या ललित लेख संग्रहाना.

स्व सौ बदामबाई हेमराज देसर्डा यांच्या स्मरणार्थ सूर्योदय शब्दरंग पुरस्कार - ॲड मुकुंदराव जाधव (जळगाव) यांच्या मनाच्या नजरेतून या काव्यसंग्रहाला.

स्व शांताराम लक्ष्मण महाजन यांच्या स्मरणार्थ सूर्योदय कादंबरी पुरस्कार - प्रा डॉ विलास धनवे (जळगाव) यांच्या हिरवं सपान या कादंबरीला

स्व संपतसिंग राजपूत यांच्या स्मरणार्थ सूर्योदय बाल साहित्य पुरस्कार - प्रशांत वि.गौतम (छत्रपती संभाजीनगर ) यांच्या ओट्यावरची शाळा या बालकथा संग्रहाला.

सर्वोदयी निर्मला पापालाल पवार यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय सूर्योदय निर्मलगंध पुरस्कार - सचिन परशराम शिंदे (मुरली जि यवतमाळ ) यांच्या पातीवरल्या बाया या काव्यसंग्रहाला.

स्व दामू वासनकर यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय सूर्योदय बालसाहित्य पुरस्कार - विठ्ठल जाधव (शिरूर कासार जि बीड) यांच्या अटर का पटर या बालकुमार संग्रहाला.

स्व किसन राजाराम पाटील यांच्या स्मरणार्थ खानदेश स्तरीय सूर्योदय काव्य पुरस्कार - सौ जयश्री काळवीट (भुसावळ) यांच्या कवितेच्या गहि-या डोही या काव्य संग्रहाला

सूर्योदय विभावना पुरस्कार - ॲड चैत्राम पवार (धुळे) यांच्या चैत्र पालवी या काव्यसंग्रहाला.

इयत्ता आठवीतील समृद्धी किरण स्वाती दामले (डोंबिवली) हिच्या चिनूच्या गोष्टी या कथा संग्रहाला

तरी संमेलनास उपस्थित राहवे ही विनंती.

संमेलन सर्वांसाठी खुले असून संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष अनिल सर्जेराव पाटील सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन , शहराध्यक्ष साहेबराव पाटील, उपाध्यक्ष विनोद निळे , प्रवीण लोहार , सचिव डी बी महाजन कु गायत्री पाटील यांनी केले आहे.

***




# सौ.प्रतिमा अरुण काळे यांना मानवाधिकार पुरस्कार प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** मानवी हक्क, संरक्षण व जागृती आणि पुणे जिल्हा विधीसेवा प्राधिकरण आणि जाधवर लॉ कॉलेज पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवाधिकार पुरस्कार वितरण सोहळ्यात, सरस्वती माध्य. विद्यालय, आकुर्डी पुणे ३५, या शाळेतील शिक्षिका सौ.प्रतिमा अरुण काळे यांना ''मानवाधिकार पुरस्कार'' पुणे जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा विधिसेवा प्राधिकरणचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांच्या अधक्षतेखाली मा.न्यायाधीश आर.आर देशपांडे सर, मा.न्यायाधीश रेवती देशपांडे मॅडम, लॉ कॉलेजचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर सर, पोलिस प्राधिकरण प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश रामेश्वर जटाळे, लेप्टनंट कर्नल शिरीषकुमार, डॉ.सुधाकरराव जाधवर, कुचेकर सर, अण्णा जोगदंड ,जोगदंड मॅडम, शंकर नाणेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक कार्याची पोचपावती म्हणून हा सन्मान दिल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. याबद्दल निवड समितीचे सौ.प्रतिमा काळे मॅडम यांनी विशेष आभार मानले. कारण हा निःस्वार्थपणे केलेल्या कार्याचा निःस्वार्थपणे केलेला सन्मान होता.

# संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान जनजागृती प्रश्नमंजुषेचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**नागपूर –** संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या पुढाकाराने आयोजित संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मुलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना संविधानाची समज वाढविण्यासाठी, तज्ज्ञ मार्गदर्शन, अनुभवात्मक शिक्षण आणि अभ्यास साहित्य प्रदान करण्याच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जागरूक, उत्तरदायी आणि सशक्त नागरिक होण्याची संधी मिळणार असल्याचे आयोगाचे उपाध्यक्ष ॲड धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.



दीक्षाभूमीजवळील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयात आज बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे प्रत्यक्ष तर शिक्षण संचालक, अल्पसंख्याक विकासाचे अवर सचिव, इतर मागासवर्ग विभागाचे सह सचिव, उच्च शिक्षण विभागाचे सह संचालक, तंत्र शिक्षणचे सह संचालक, महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ अधिकारी, राज्यातील सर्व जिल्हा माहिती अधिकारी दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

**अशी असणार स्पर्धा :**

संविधान जागृती प्रश्नमंजुषा २०२५ महाराष्ट्र राज्यातील ८ वी ते पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली गेली आहे. ही स्पर्धा पुर्णपणे ऑनलाईन स्वरूपात असेल. विद्यार्थी www.yuvacareer.com या संकेतस्थळावर भेट देऊन कार्यक्रमाची सविस्तर माहिती, नोंदणी प्रक्रिया, ऑनलाईन प्रशिक्षण, तसेच प्रश्नमंजुषेची सर्व माहिती मिळवू शकतात.

**भाषा निवडः**

संविधान जागृती प्रश्नमंजुषा २०२५ ही मराठी, इंग्रजी, हिंदी या तीन भाषांमध्ये आयोजित केली जाईल. विद्यार्थी इच्छेनुसार कुठलीही एक भाषा निवडू शकतात.

**शुल्कः**

प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ९९ रुपये शुल्क निश्चित केले गेले आहे. शाळा, महाविद्यालये, वसतिगृह आणि आश्रमशाळांना हे शुल्क भरावे लागेल. फक्त महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊ शकतीत.

**संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन :**

सर्व प्रक्रिया www.yuvacareer.com संकेतस्थळावर ऑनलाइन पार पडणार आहे. अधिकृत संकेतस्थळावरच तपशील उपलब्ध असणार आहे. फेक लिंक आणि अनोळखी व्यक्तींनी पाठवलेल्या लिंकवर क्लिक करू नका, असे ते म्हणाले.

**पुरस्कार**

प्रथम पुरस्कार १ लाख रुपये रोख, चषक व प्रमाणपत्र, द्वितीय पुरस्कार ५१ हजार रुपये रोख, चषक व प्रमाणपत्र, तृतीय पुरस्कार ११ हजार रुपये रोख, चषक व प्रमाणपत्र तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. हे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचा सन्मान करेल आणि त्यांना भविष्यातील कार्यात प्रेरणा देईल.

**नोंदणी कालावधी व परीक्षा**

३१ डिसेंबर पर्यंत नोंदणी कालावधी आहे. नोंदणी फक्त www.yuvacareer.com या अधिकृत संकेतस्थळावर केली जाऊ शकते. मॉक टेस्टः २० जानेवारी २०२६, पहिली फेरी क्विझः २२ जानेवारी २०२६६ तर अंतिम क्विझः प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२६ असणार आहे.

# ग्रेट फोटोग्राफर - मेजर रॉबर्ट गिल

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

दुस-या जालना येथील भारतीय साथीदाराशी रॉबर्ट गिल यांनी विवाह केला. तिस-या भारतीय साथीदाराकडून रॉबर्ट गिल यांना दोन मुली झाल्या. मिल्ड्रेड मेरी गिल (१८६६-१९२३) आणि ॲनी गिल (सुमारे १८६४-१९३४) या वंशजांमधून आजपर्यंत रॉबर्ट गिल यांची वंशावळ चालू आहे.

१८५० ते १८५४ या काळात तयार झालेल्या अजिंठा चित्रांच्या काही कलाकृती लंडनमधील क्रिस्टल पॅलेसमधील इंडियन कोर्ट मध्ये प्रदर्शनासाठी मांडल्याने अजिंठा चित्रकलेची प्रथम मोठी ओळख युरोपात झाली. या प्रतिकृतीवरून तयार झालेल्या नक्षीकामाची उदाहरणे ओवेन जोन्सच्या ग्रामर ऑफ ऑरनामेंट सारख्या प्रभावी ग्रंथात वापरली गेली. यामुळे भारतीय आणि विशेषतः अजिंठ्याच्या अलंकरण शैलीचा अभ्यास पाश्चात्य वास्तुकला व डिझाइन जगतात सुरु झाला. पुढे गिल यांनी फोटोग्राफीचा अभ्यास करून अजिंठा, वेरूळ, खान्देश, लोणार सरोवर, मुक्तगिरी, पश्चिम विदर्भ व मराठवाड्यातील मंदीरे आणि इस्लामी वास्तू यांची शेकडो प्रकाशचित्रे काढली. या छायाचित्रांनीही पश्चिम भारतातील वारसा प्रथमच व्यवस्थित नोंदवून जगासमोर आणला. ''वन हंड्रेड स्टिरिओस्कोपीक इल्युस्ट्रेशन्स ऑफ आर्किटेक्चर ॲन्ड नॅचरल हिस्टरी इन वेस्टर्न इंडिया'' आणि ''रॉक-कट टेम्पल्स ऑफ इंडिया'' या नावांनी त्यांची छायाचित्रे जेम्स फर्ग्युसन यांच्या लेखनासह प्रसिद्ध झाली. ज्यामुळे अजिंठा-वेरूळ आणि इतर गुफा मंदिरांची शास्त्रीय पातळीवरील माहिती युरोपमध्ये प्रस्थापित झाली.



१८६६ मध्ये अजिंठ्यात आग लागून त्यांच्या अनेक मूळ चित्रप्रतिमा नष्ट झाल्या. फक्त चार मोठ्या कॅनव्हास विक्टोरिया अल्बर्ट म्युझियममध्ये शिल्लक आहेत. रॉबर्ट गिल यांनी १८७० च्या सुमारास अजिंठाच्या फोनेग्राफीचे मोठे सरकारी काम पूर्ण केले आणि हा संग्रह तत्कालीन ब्रिटिश सरकारकडे सुपूर्द केला. गिल यांनी काढलेल्या रंगीत प्रतिकृती आणि नंतरची छायाचित्रे नसती तर अनेक भित्तीचित्रे काळाच्या ओघात अधिक झिजून गेल्यामुळे आज आपण पाहू शकत असलेला दृष्य पुरावा इतका स्पष्ट राहिला नसता असे संशोधकांचे मत आहे. म्हणूनच अजिंठा-वेरूळ आणि पश्चिम भारतातील वास्तू व चित्रकलेचा वारसा,जागतिक इतिहास, कला-अभ्यास आणि संग्रहालयांच्या स्तरावर पोचवण्यात रॉबर्ट गिल यांचे योगदान मोलाचे आणि निर्णायक मानले जाते. १८७९ मध्ये रॉबर्ट गिल यांचे भुसावळ (जळगाव) येथे निधन झाले. तेथे सेंट पॉल चर्च सीमेटरीत त्यांची समाधी आहे. आज मराठी व भारतीय वारसा अभ्यासात त्यांचा उल्लेख ''अजिंठ्याची चित्रकला जागतिक पातळीवर नेणारा पहिला चित्रकार-छायाचित्रकार'' असा केला जातो. रॉबर्ट गिल यांची कुटुंब वंशावळ इंग्लंड, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम या ठिकाणी आपापल्या उद्योगात काम करीत आहे.



*शिरीष चिटणीस*
*सातारा मो. 75888 65051*

# महासत्ता भारत - सोनेरी भविष्याची वाटचाल

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

शेवटच्या माणसाचे सुख:

''रस्त्यावरील भिकारी पण यावेळी आपले जीवन आनंदात जगेल हो, महत्वाचे म्हणजे शेवटचा माणूसही यावेळी सुखी होईल.'' हे विधान या कल्पनेचे मूळ उद्दिष्ट आहे - समाजातील सर्वात दुर्बळ घटकालाही सन्मानाचे जीवन जगण्याचा हक्क मिळेल.

सुजलाम सुफलाम भारताची संकल्पना

जेव्हा लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतील, तेव्हा देशाचे लक्ष विकासाच्या पुढील टप्प्याकडे जाईल.

मागणीत वाढ : प्रत्येक कुटुंबाकडे पैसा आल्याने, बाजारात वस्तू आणि सेवांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढेल. यामुळे उत्पादन वाढेल आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीला मोठी गती मिळेल.

उद्योजकता वाढेल :

अनेक लोक या भांडवलाचा उपयोग लहान व्यवसाय सुरू करण्यासाठी करतील. यामुळे नव्याने रोजगार निर्मिती होईल आणि अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

समाधानाचा देश:

कर्जमुक्ती आणि आर्थिक सुरक्षिततेमुळे समाजात शांतता आणि आनंद वाढेल. जेव्हा लोक सुखी असतील, तेव्हा भारत खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम होईल, जिथे केवळ शेती आणि निसर्गातच नव्हे, तर लोकांच्या चेहऱ्यावरही समृद्धी दिसेल.

या कल्पनेचे व्यावहारिक आव्हान ही कल्पना सामाजिक न्यायासाठी अत्यंत प्रभावी असली तरी, अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून काही व्यावहारिक आव्हाने लक्षात घेणे आवश्यक आहे:

महागाई :

एकाच वेळी इतकी मोठी रक्कम बाजारात आल्यास वस्तू आणि सेवांच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढतील, ज्याला महागाई म्हणतात. त्यामुळे आज १ कोटीला जी वस्तू मिळत आहे, ती उद्या १ कोटीत मिळणार नाही.

उत्पादनाचे आव्हान:

संपत्ती वितरित झाली तरी, देशातील उत्पादन किंवा सेवांची निर्मिती तेवढीच राहील. पैशाची उपलब्धता वाढेल, पण त्या प्रमाणात वस्तू उपलब्ध नसल्याने, त्वरित आर्थिक अस्थिरता निर्माण होऊ शकते.



प्रा.भगवान केशव गावित
कार्याध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉई फेडरेशन, पुणे जिल्हा
मो.नं. ९३०७००५४३१

भावनिक आणि सांस्कृतिक समर्पकता

जेव्हा भारत आर्थिक आणि सामाजिक दोन्ही स्तरांवर प्रगती करेल, तेव्हा खऱ्या अर्थाने आपण आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करू शकू. जहाँ डाल डाल पर सोनेकी चिडिया करती है बसेरा वह भारत देश है मेरा या देशभक्तीपर गीताचा खरा अर्थ तेव्हाच सिद्ध होईल. सोन्याची चिमणी हे केवळ आर्थिक संपत्तीचे प्रतीक नाही, तर ज्ञान, समृद्धी, शांतता आणि नैतिकतेचे प्रतीक आहे. २०४७ मध्ये भारत केवळ डॉलरमध्ये अब्जाधीश नसेल, तर तो अध्यात्म, योग, विज्ञान आणि शांततामय सहअस्तित्वाच्या मूल्यांमध्ये जगाचे नेतृत्व करणारा देश असेल.

२०४७ चा भारत हा केवळ स्वप्न न राहता, प्रत्येक भारतीयाच्या सामूहिक प्रयत्नांनी साकार होणारी एक वास्तवता असेल. ही वाटचाल केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या () वाढीची नाही, तर मानवी विकास निर्देशांक () आणि आनंद निर्देशांक (हॅप्पीनेस इंडेक्स) वाढवण्याची आहे. जेव्हा प्रत्येक नागरिकाला सुरक्षित छत मिळेल, उत्तम शिक्षण मिळेल आणि स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची संधी मिळेल, तेव्हाच भारत महासत्ता बनेल आणि पुन्हा एकदा सोन्याची चिमणी म्हणून जगात दिमाखात उभा राहील!

जस मी मुख्यमंत्री झालो तर असं करेन तसं करेन, हि एक कल्पना आहे जी खरंच प्रत्यक्षात उतरली तर माझ्या सर्व लोकांचे स्वप्न सत्यात उतरेल आणि माझा भारत खरंच बलाढ्य होईल असे मला वाटते. आपले मत जरूर नोंदवावे.

**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559